महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

सत्यमेव जयते

# पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा.

९३, मल्हार पेठ, सातारा.
दुरध्वनी क्रमांक ०२१६२-२३२२२५
ई-मेल आय डी- sp.satara@mahapolice.gov.in

पुण्यश्लोक ३००

जा.क्र/जिवानिशा/वाहतुक अधिसुचना/३४०/२०२५ पोलीस अधीक्षक कार्यालय सातारा दिनांक - १७/११/२०२५

## अधिसुचना

म्हसवड पोलीस ठाणे हद्दीत मौजे म्हसवड ता.माण येथे सालाबादप्रमाणे श्री सिद्धनाथ देवाची यात्रा दिनांक १९/११/२०२५ ते २३/११/२०२५ या कालावधी मध्ये साजरी होणार असुन यात्रेचा मुख्य दिवस दिनांक २१/११/२०२५ रोजी असुन दरवर्षी नमुद दिवशी सिद्धनाथ देवाचा रथोत्सव होत असतो, सदर रथोत्सव करीता जिल्ह्यातुन तसेच राज्यातुन सुमारे ४ ते ५ लाख भाविक येत असतात. म्हसवड गावातुन सातारा ते पंढरपुर असा राज्य महामार्ग जात असुन सदर राज्य महामार्गावरुन रथ जाणार असलेने होणाऱ्या भाविकांच्या गर्दी यामुळे रस्ता वाहतूकीवर परीणाम होण्याची शक्यता असलेने सदर यात्रा कालावधीत वाहतूक सुरळीत राहणेकरीता व भविकांची/नागरीकांची तसेच वाहनचालकांची गैरसोय होवु नये याकरीता वाहतूकीचे नियोजन करणे आवश्यक आहे. त्या करीता पर्यायी मार्गाची उपलब्धता असलेने सदर मार्गावरील वाहतूक वळविणे आवश्यक आहे. त्याबाबतची अधिसुचना प्रसिद्ध करणेत येत आहे.

मी तुषार दोशी भापोसे, पोलीस अधीक्षक सातारा, मला महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३४ अन्वये प्राप्त असलेल्या अधिकारान्वये म्हसवड गावातुन जाणारा सातारा ते पंढरपुर व म्हसवड ते आटपाडी या मार्गावरील वाहतूक मार्गात बदल करुन अंतर्गत वाहतूक व्यवस्था सुरळीत राहणेकरीता दि. २१/११/२०२५ चे सकाळी ०७.०० ते रात्रौ २२.०० वा. पर्यत खालील अधिसुचना पारित करीत आहे.

## वाहतुक मार्गातील बदलाबाबत

## वाहतूक मार्गातील बदल खालीलप्रमाणे करण्यात आला आहे.

१. सातारा ते पंढरपुर व माळशिरस बाजुकडे जाणारी दोन चाकी व सर्व हलकी वाहने ही शिंगणापुर चौक येथुन युवराज सुर्यवंशी यांचे निवासस्थान समोरुन - शिक्षक कॉलनी - भाटकी रोड - भाटकी गाव - माळशिरस चौक येथुन जातील.

२. पंढरपुर व माळशिरस ते सातारा बाजुकडे जाणारी दोन चाकी व सर्व हलकी वाहने ही माळशिरस चौक - भाटकी गाव - भाटकी रोड - शिक्षक कॉलनी - युवराज सुर्यवंशी यांचे निवासस्थान समोरुन - शिंगणापुर चौक येथुन जातील.

३. सातारा ते पंढरपुर व माळशिरस बाजुकडे जाणारी सर्व प्रकारची अवजड वाहतूक ही पोळ पेट्रोल पंपाच्या पाठीमागुन - खांडेकर तालीम - शिक्षक कॉलनी - भाटकी रोड - भाटकी गाव - माळशिरस चौक येथुन जाईल.

Scanned with CamScanner

४. पंढरपुर व माळशिरस ते सातारा बाजुकडे जाणारी सर्व प्रकारची अवजड वाहतूक ही माळशिरस चौक - भाटकी गाव - भाटकी रोड - शिक्षक कॉलनी - खांडेकर तालीम - पोळ पेट्रोल पंप येथुन सातारा बाजुकडे जाईल.

५. सातारा व फलटण बाजुकडुन आटपाडी बाजुकडे जाणारी सर्व प्रकारची वाहतूक ही मायणी चौक येथुन कुकुडवाड मुख्य रस्ता - नागोबा मंदीर - मेगासिटी - वीरकरवाडी येथुन आटपाडीकडे जाईल.

६. आटपाडी बाजुकडुन सातारा व फलटण बाजुकडे जाणारी सर्व प्रकारची वाहतूक ही वीरकरवाडी - मेगासिटी - नागोबा मंदीर - कुकुडवाड मुख्य रस्ता - मायणी चौक येथुन जाईल.

७. वीरकरवाडी ते म्हसवड व रथगृह ते सरकारी दवाखाना हे रोड वाहतूकीसाठी बंद करणेत आले आहेत.

तरी वरील वाहतूक ज्या ज्या ठिकाणावरुन वळविण्यात आली आहे. त्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त नेमण्यात आला आहे. वरील वाहतूक मार्गात केलेल्या बदलांसाठी सर्व भाविकांनी/नागरीकांनी व वाहन चालकांनी नोंद घेवून पोलीस दलास सहकार्य करावे.

सदरची अधिसुचना माझ्या स्वाक्षरी व शिक्यानिशी दिनांक १७/११/२०२५ रोजी जारी करण्यात आली आहे.

पोलीस अधीक्षक सातारा

(तुषार दोशी) भापोसे
**पोलीस अधीक्षक सातारा**

ठिकाण - सातारा
दिनांक - १७/११/२०२५
प्रति,

१) मुद्रण व्यवस्थापक, कारागृह मुद्रणालय, पुणे
  २/- महाराष्ट्र राजपत्रकामध्ये आदेश प्रसिध्द करुन प्रति रेकॉर्डकरता पाठविणेबाबत.
२) जिल्हा माहीती अधिकारी, सातारा यांना वृत्तपत्रात प्रसिध्दी करण्यासाठी.
३) संपादक/प्रतिनिधी, दैनिक ऐक्य, पुढारी, लोकसत्ता,लोकमत, तरुण भारत, सकाळ, सामना, ग्रामोध्दार, पुण्यनगरी, महाराष्ट्र टाईम्स, तिरंगा, मुक्तागीरी, जिव्हाळा यांना वृत्तपत्रात प्रसिध्द करणेसाठी
४) पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण, सांगली, पुणे ग्रामीण
  २/- सदर आदेशाची प्रसिध्दी आपल्या कार्यक्षेत्रातील स्थानिक वृत्तपत्रामध्ये करणेस विनंती.
५) सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सातारा जिल्हा.
६) सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी सातारा जिल्हा.

<u>प्रत माहीतीसाठी सादर</u>

८) मा.विशेष पोलीस महानिरीक्षक कोल्हापुर परिक्षेत्र कोल्हापुर.
९) मा.जिल्हाधिकारी सातारा.
१०) पोलीस अधीक्षक,महामार्ग परिक्षेत्र पुणे.

Scanned with CamScanner